## महाराष्ट्र शासन
## धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
## मुंबई यांचे कार्यालय

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक०२२- २४९३५४३४ २४९३५४९०
२४९३०४९९ २४९३५५१६
फॅक्स ०२२-२४९७६४२०
Email Id:- property.mum-mh@gov.in

Dharmaday Ayukt Bhavan
3rd Floor, 83,Dr. Annie Besant
Rd,Worli, Mumbai - 400 018
Tel No.022- 24935434 24935490
24930499 24935516
Fax-022-24976420
Website :- charity.maharashtra.gov.in

जा.क्र./**मालमत्ता**/ 8256 /२०२१ दिनांक- 2/8/202

संदर्भ:- १) स्थलांतरण समिती दि. २८.७.२०२१ व दि. ३०-७-२०२१ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त

# निविदा सुचना

या व्दारे, सर्व संबंधीतांना सुचित करण्यात येते की, **धर्मादाय आयुक्त कार्यालय** (मुख्यालय), पहीला मजला **अभिलेखा शाखा**, धर्मादाय आयुक्त भवन, वरळी नाका, वरळी, मुंबई-१८ च्या अंतर्गत अभिलेखा ठेवणेसाठीचे Compactor (मेक- गोदरेज)-१९ चे सध्याचे वरील कार्यालयातुन 'ससमीरा' इंस्टीट्युट, ससमीरा मार्ग, वरळी, मुंबई येथील इमारतीमध्ये स्थलांतरण करावयाचे आहे. (Dismentaling- Moving /shifting - Reinstalling/ Assembling)

उपरोक्त प्रमाणे पहीला मजला अभिलेखा शाखा मधील **१८-Compactor** (मेक- गोदरेज)- **कार्यालयीन वेळेत** ( सकाळी १० ते ४) पाहणीसाठी उपलब्ध आहेत. सदर Compactor सध्याचे धर्मादाय आयुक्त भवन येथुन Dismantle(भाग वेगवेगळे करून) ते नवीन इमारतीत नेणे व तेथे Assemble (पुन्हा सुट्या भागांची जुळणी करणे) करणे व संपुर्ण Compactor (गोदरेज) ची व्यवस्था सुरळीतपणे कार्यान्वीत करणे आहे.

त्याकरीता बाह्य यंत्रणे मार्फत निविदा / दरपत्रके मागविण्यात येत आहेत. खालील अटी व शर्थी नुसार त्यामान्य असल्यास निविदा **दि. ९-०८-२०२१ रोजी दुपारी ४:०० वाजे पर्यत** या कार्यालयातील मालमत्ता शाखेत सिलबंद लिफाफा जमा करावा. त्यानंतर प्राप्त होणा-या निविदांचा विचार केला जाणार नाही.

१) दरपत्रके देणारी संस्था किंवा कंपनी किंवा एकल व्यवसायीक नोंदणीकृत असणे आवश्यक आहे.

३) सदरचा करार झाल्यानंतर या कार्यालयाचे संपुर्ण अभिलेखा Compactor मध्ये पुनः स्थलांतरीत होईपर्यंत व कार्यान्वयन सुरळीत होई पर्यंत हा करार निविदाकारास रद्द करता येणार नाही. या दरम्यान करावा लागणारा खर्च मनुष्यबळ, वाहतुक, इतर साहीत्य व दुरूस्ती (लागल्यास) इत्यादींचा खर्च व कालावधी आपल्या निविदेमध्ये स्पष्टपणे नमुद करावेत.

४) या विषयी आणखी माहिती आवश्यक असल्यास तसेच उपकरणाची Compactor (गोदरेज) माहिती घेणेस अधिक्षक( मालमत्ता) शाखा, तसरा मजला, मुख्यालय यांचेशी संपर्क साधावा.

५) निविदा दाखल करणा-या संस्था किंवा कंपनी चे Pan Card व GST नोंदणीपत्र असणे आवश्यक आहे.

६) दरपत्रके ही GST सह देण्यात यावीत.

७) काम करणा-या कारागिरांची जबाबदारी ही संबंधीत संस्था / कंपनीची राहील तसे हमीपत्र सोबत द्यावे.

८) काम करणा-या कारागीरांना संस्था किंवा कंपनीचे ओळखपत्र देणे आवश्यक आहे.

९) काम करणा-या कारागीरावर देखरेख करण्याकरीता सुपरवायझर नेमण्याची जबाबदारी कंपनीची असेल.

१०) वाहतूक करणाऱ्या गाडीचे सर्व कागदपत्रे R.C BOOK, Insurance, PUC व गाडी चालकाचे LICENSE परवाना अद्यावत असणे आवश्यक आहे.

११) पावसाचे दिवस असल्याने व महत्वाची कागदपत्रे असल्याने गाडीचे छप्पर बंदिस्त असणे आवश्यक आहे.

१२) वापरण्यात येणारी गाडी हि केवळ ट्रक असणे आवश्यक आहे. आवश्यकतेनुसार टेम्पो तत्सम वाहन या विभागाच्या संबधित अधिकाऱ्यांच्या परवानगीने वापरता येईल

१३) स्थलांतरणाचे काम करतांना कार्यालयातील कोणतीही वस्तू हलवितांना काळजीपूर्वक हालचाल करण्याच्या सूचना कामगारांना देण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. नुकसान झाल्यास व त्याची भरपाई करावी लागल्यास देय रकमेतून कपात करण्यात येईल.

१४) निविदाकारांनी मागील ३ वर्षांचे इन्कम टॅक्स रिटर्नची प्रत सोबत जोडावी.

१५) सदर निविदा प्रक्रीया कोणतेही कारण न देता थांबवणे/रद्द करणे/पुढे ढकलणे किंवा या संदर्भातील सर्व अधिकार हे सक्षम अधिका-यांकडे राखुन ठेवलेले आहेत.

१६) निविदाकारांच्या अटी व शर्थी असलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाही. तसेच या कार्यालयाच्या वर नमुद केलेल्या अटी व शर्थी मान्य नसलेल्या निविदा देखील मान्य केल्या जाणार नाहीत.

१७) वर्क ऑर्डर दिल्यानंतर तात्काळ कामाला सुरवात करणे बंधनकारक असेल.

१८) सदर निविदा प्रक्रीयेत स्वारस्य असणा-या पुरवठादारांनी त्यांच्या निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये सदर सुचना प्रसिद्ध झाले नंतर **दि. ९-०८-२०२१ रोजी दुपारी ४:०० वाजे पर्यंत** - मालमत्ता शाखा- ३रा मजला, धर्मादाय आयुक्त भवन, वरळी,मुंबई-१८ येथे जमा कराव्यात. त्या निविदा दुपारी ५:०० वाजता उघडण्यात येईल.

स्थळः- मुंबई

दिनांक - / /२०२१

02/08/2021

**उ. सचिव, स्थलांतरण समिती,**

धर्मादाय आयुक्त कार्यालय, मुंबई